
Vol No.: 4 Issue No. 3 Nov. 2018

ISSN No. : 2350-1391

NIVRJ

# NEW INTERNATIONAL VALUABLE RESEARCH JOURNAL



♦ Chief Editor ♦

Asst. Prof. A . V. Hingmire

Prathmesh Prakashan

Prathmesh Prakashan, Aurangabad

UGC Journal An Peer Reviewed International Journal

*NEW INTERNATIONAL*
**VALUABLE RESEARCH JOURNAL**

*Impact Factor 2.66*

## AIMS & SCOPE

New International Emergent Research Journal is a Quarterly International Journal publishing in multidisciplinary. It is published in All Subject and All Languages.

New International Emergent Research Journal has been started to publish the research paper by great thinkers, intelligentia, scholars, lecturers. Those who have contributed in the field of Higher Education and Research for advanced Knowledge.

**Chief Executive Editor**
Asst. Prof. A.V. Hingmire

**The Editor, Editorial Board and Publisher assume no responsibility for statements and opinions expressed by the Author in this Research Journal**

Single Issue Rs. 300/-, Life Membership Rs. 10000/- (Ten Years)
Each Paper Rs. 1200/- Institution Yearly Rs. 1200/-

## Instruction Call for papers

The Papers must be an original constribution. The size of the paper should not exceed 2000 to 2500 words in A4 size. in Pagemaker 7.0, Time New Roman (Font size - 12) for English and ISM DVB-ttsurekh (Font size 14) font in Marathi and Hindi. along with paper should the title, Authors Name, mailing address and Telephone Nos.

**Mode of payment :** Payble at State Bank of India Ambajogai Dist. Beed
Account No. : 32887113235, Hingmire A.V.
IFSC Code : SBIN0003403

**For Details Information Please visit www.prathmeshpublication.in**

*NEW INTERNATIONAL*
**VALUABLE RESEARCH JOURNAL**

# CONTENTS


| Sr. No. | Title & Name of the Author(s) | Page No. |
|---|---|---|
| 1 | BABA SAHEB DR. B. R. AMBEDKAR'S PERSPECTIVE FOR WOMEN PROGRESS IN INDIAN REALITY<br>*DR. INDIRA* | 01 |
| 2 | A study of awareness of the male students studying at under graduate level regarding the environmental crisis<br>Dr. Balaji Rangnathrao Lahorkar | 08 |
| 3 | "चंद्रपुर जिल्हयातील माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्तींचे तुलनात्मक अध्ययन."<br>प्रा. अनिल पी. नंदेश्वर | 12 |
| 4 | European trends inGolconda School of Miniature Paintings depicting Women<br>-DrB.Lavanya. | 16 |
| 5 | Management of Tensions in Today's World<br>Prin. L. K. Shitole, | 20 |
| 6 | सर्जनशीलता (creativity)<br>प्रा. राजपुत डी.जी. | 23 |
| 7 | आर्थिक विकासातील आवश्यक परिस्थितीचे अध्ययन<br>डॉ. संजय वनविजय | 25 |
| 8 | LEVELS OF MODERNIZATION AMONG SCHOOL TEACHERS BELONGING TO TRIBAL COMMUNITY<br>*Mrs. V. Saraswathi / Prof. D.Srinivas Kumar* | 29 |
| 9 | A study of Emerging Trends in Teacher Education<br>Dr. Dilip R. Channawar | 35 |
| 10 | मानवतेचे प्रेरणास्थान सर्वज्ञ श्री चक्रधार स्वामी<br>प्रा. पुजदेकर एच.एस. | 38 |
| 11 | जालना जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास<br>A study of Adjustment of Secondary School teachers in Jalna District<br>प्रकाश विठ्ठल गाडेकर / प्राचार्य.डॉ.लाहोरकर बालाजी रंगनाथराव/ प्रा.डॉ.गिर्नागिने अशोक पांडुरंगराव | 40 |

| | | |
|---|---|---|
| 12 | **Human Recourse Development and Singareni Collieries Company Limited (SCCL)**<br>Boya Vani | 44 |
| 13 | शासकीय आरोग्य धोरणानुसार बिदर जिल्ह्यातील आवश्यक प्राथमिक आरोग्य केंद्र<br>पाटील भाग्यश्री शंकरराव | 48 |
| 14 | **Rock Material and Technique of Lord Buddha Sculptures in Nizamas Museum**<br>MandalojuSujatha | 50 |
| 15 | **ఆటల్లేవ్ - మాటల్లేవ్!**<br>ఆర్. గోపాల్ | 55 |
| 16 | सर्जनशिलतेचे मुल्य<br>प्रा. डी. जी. राजपूत | 62 |
| 17 | **संत चोखामेळा यांची दलित जाणिवेची संत कविता**<br>संदिप आसाराम खंडीभराड | 65 |
| 18 | **शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय**<br>**प्रा.डॉ.बिरादार बी.एम.** | 68 |
| 19 | **Transmissional and Constructivist Approaches of Instruction for Inculcating Problem Solving Ability and Reflective Thinking**<br>**Dr khan Shahnaz Bano Mohammad Ashfaque** | 71 |
| 20 | **शिक्षकांचे अध्ययन-अध्यापन-भूतकाळ,वर्तमानकाळ व भविष्यकाळ**<br>प्राचार्य डॉ. झेंडे सुखदेव सिताराम | 75 |
| 21 | **Administrative role of Teacher in Higher Education**<br>Dr. Prashant Namdeorao Patil | 80 |
| 22 | **योग साधना व विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास**<br>श्री राठोड कैलास झाबुसिंग | 85 |
| 23 | **आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक समस्या**<br>अनुपमा दिलीपराव पाटील | 87 |
| 24 | **दलित काव्यातील विद्रोह**<br>गोरे मारुती प्रभू | 89 |
| 25 | **आदिवासी आत्मकथनांतील सांस्कृतिक चित्रण**<br>डॉ. विठ्ठल केदारी | 93 |
| 26 | **लिंग आधारीत बजेट आणि वास्तवीकता**<br>**डॉ. किशोर हरिष धोटे** | 97 |
| 27 | **महानुभाव साहित्यातील 'स्त्री'**<br>**डॉ. स्मिता खोंडे** | 10 |

ORIGINAL ARTICLE

# दलित काव्यातील विद्रोह

गोरे मारुती प्रभू
संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**सारांश :-**

दलित काव्य हा १९६० नंतरच्या काळात मोठया प्रमाणात उदयास आलेला काव्य प्रकार आहे. त्याचा मुख्य स्वर हा विद्रोहाचा आहे. माणसाने माणसावर केलेले अत्याचार काव्य रुपाने व्यक्त झाले आहेत. चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि मनूवादी संस्कृतीवर दलित काव्यातून प्रहार झालेले दिसतात. त्याचप्रमाणे येथिल रुढी, परंपरा, देव, धर्म कर्मकांडे यांना नकार देऊन विद्रोह केला आहे. दलित काव्याने माणसाला, माणूसपणाला त्याच्या विकासाला, विवेकनिष्ठ विचाराला व मुक्तीला केंद्र मानले. त्यासाठीच विद्रोह केला.

दलित काव्यातील विद्रोह हा दलित कवींच्या जगण्यातून व अनुभवातून आलेला आहे. दलित कवीने जे भोगले, पाहिले त्यातूनच दलित काव्यातील विद्रोह प्रकटला आहे. तो व्यक्त करताना त्याची भाषा सरळ, स्पष्ट, रोखठोक, आक्रमक, दाहक व निर्भय आहे. त्यामुळे दलित काव्यातील विद्रोह अधिक ठसठशीत झाला आहे. दलित काव्यातील विद्रोहाला परिवर्तन घडवून स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय ही मूल्ये रुजवायची आहेत. त्यातूनच विज्ञाननिष्ठ, बुध्दीनिष्ठ, विवेकवादी व समताधिष्ठीत नवसमाज घडवायचा आहे.

**प्रस्तावना -**

दलित काव्य हे दलित जीवनाचे अविभाज्य अंग आहे. गावकुसाबाहेर राहणाऱ्या समाजाच्या जीवनाकडे माणूस म्हणून साहित्याने पाहिले नाही. त्यांच्या मनातला हुंदका जगाला ऐकविला नाही अशा अदृश्य दलित माणसाला जगाच्या पुढे दलित काव्याने आणले. दलित काव्याचा जन्म तळागाळातील बहुजन समाज जीवनातून झाला आहे. त्यांचे एक विशिष्ट दुःख आहे. त्या दुःखातून मुक्तीचा मार्ग दलित काव्य शोधते.

**संशोधन विषयाचे उद्देश -**

१) दलित काव्याचा अभ्यास करणे.

२) दलित काव्यातील विद्रोहाचा शोध घेणे

३) दलित काव्यातील विद्रोहाचे निष्कर्ष मांडणे

**संशोधन पध्दती -**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रामुख्याने संदर्भान्वयी व संश्लेषणात्मक, विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

दलित काव्यातील विद्रोहाचा अभ्यास करताना सुरुवातीला दलित कोणाला म्हणावे? हे पाहणे गरजेचे आहे. डॉ.सुरेश पैठणकर म्हणतात, “दलित हा शब्द उच्चारताच आपल्या डोळयासमोर उभा राहतो तो जीवनाच्या कोणत्या ना कोणत्या अंगाने नाडला गेलेला एक मानवी समूह. दुःख, दैन्य, दारिद्रय, अज्ञान, कष्ट, अन्याय, अत्याचार यात पिळून निघालेल्या माणसाला स्थूलमानाने दलित म्हणता येईल.”[१] तर अर्जुन डांगळे म्हणतात, “दलित म्हणजे शोषित-पीडित असा समाज होय, धर्माच्या नावाखाली व अन्य कारणांनी ज्याचे

आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक शोषण केले आहे तो जनसमूह म्हणजे दलित होय."[२] यावरुन आपणास दलित कोणास म्हणावे याचा बोध होतो. यानंतर काव्य म्हणजे काय? ते पाहू. काव्याच्या व्याख्या अनेक साहित्यशास्त्रकारांनी केल्या आहेत. विश्वनाथ पंडित म्हणतात, "वाक्यं रसात्मकं काव्यम्"[३] म्हणजे ज्यात रस आहे अशा वाक्याला काव्य म्हणावे. तर वर्डस्वर्थ म्हणतात, "उत्कट भावनेचा सहजोद्रेक म्हणजे काय."[४] आपल्या मनातील भावनेचा सहज झालेला उद्रेक म्हणजे काव्य होय. असा साधा, सोपा काव्याचा अर्थ लक्षात येतो. आपणास दलित काव्यातील विद्रोह अभ्यासावयाचा असल्याने विद्रोह म्हणजे काय? याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. 'विद्रोह' या शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना डॉ. श्रीराम गुंदेकर म्हणतात, "जे जे कालबाहय आहे, टाकाऊ आहे, मानवता विरोधी आहे, त्याला नकार देणे, विरोध करणे आणि जे जे विधायक व मानवतावादी आहे, अशा मूल्यांचा आग्रह धरणे, त्यासाठी ठोस व विधायक कृती करणे म्हणजे विद्रोह."[५] यावरुन विद्रोहाचा अतिशय व्यापक अर्थ स्पष्ट होतो. अशा प्रकारचा विद्रोह दलित काव्यातून आलेला दिसतो. बाबुराव बागूल म्हणतात,

"ज्यांनी केली चूक इथे जन्म घेण्याची
त्यांनीच ती सुधारली पाहिजे :
देश सोडून अथवा भीषण युध्दे करुन."[६]

कवीने प्रस्थापित व्यवस्थेविरुद केलेला हा विद्रोह आहे. प्रत्येक दलित कवीने अस्पृश्यते विरुध्द संताप व्यक्त केला आहे. या व्यवस्थेमध्ये दलितांना अतिशय तुच्छ जीवन जगावे लागले. म्हणून ही व्यवस्था मोडून टाकली पाहिजे. त्यासाठी आपण क्रांती करण्यास तयार असले पाहिजे असा त्यांना विश्वास आहे. रामराज्याची स्तुती गाणाऱ्या कवीला उद्देशून दया पवार म्हणतात,

"हे महाकवे
तुला महाकवी तरी कसे म्हणावे!
हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास
तर तुझे नाव काळजावर कोरुन ठेवले असते. "[७]

गावाबाहेरील दलित वस्तीतील लोकावर अनेक अन्याय, अत्याचार केले जात होते. त्यांचे जीवन दु:खमय बनले होते. या लोकांनी मुक्तीसाठी फोडलेला टाहो तुझ्या कानावर आला नाही का? रामराज्याची स्तुती गाणाऱ्या महाकवे तू त्यांच्यासाठी एक श्लोक रचला नाहीस. त्यामुळे तुला महाकवी तरी कसे म्हणावे अशी विद्रोही भूमिका दया पवार घेतात. तर नामदेव ढसाळ म्हणतात,

"हजारो वर्षे मी होतो खंगत,
यागुहागुहातल्या प्रचंड अंधारात
कालच तो गुहेच्या तोंडाशी ठेवून गेला पिसाळलेला जाळ
मी शिलगावीत जाणार आहे यापुढचा काळ"[८]

हजारो वर्षे अंधारात खंगत असलेल्या दलित समाजाला प्रकाश देण्याचे काम नामदेव ढसाळ यांनी केले आहे. त्यांच्या कवितेतील विद्रोह अतिशय स्फोटक आहे. तो कुणाचीही भिडभाड राखत नाही. अतिशय निर्भयपणे त्यांनी प्रस्थापित व्यवस्थेवर प्रहार केले आहेत. या व्यवस्थेने केलेल्या अन्यायाला सामोरे जाताना ते म्हणतात यापुढचा काळ मी शिलगावीत जाणार आहे. त्यासाठी विद्रोहाची गाणी गाणार आहे. याच वाटेने पुढे जाताना वामन निंबाळकर म्हणतात,

"मनूच्या वारसदारांनो! हजारो वर्षापासून पाहताहोत आम्ही
नग्न सांयवेळा आमच्याच

गावकुसाच्या बाजूला चार-सहा झोपडयांत
जळताहेत आमची असंख्य कलेवरे
ज्यांना तुम्ही जाळले, तुमच्या नादान विचारांनी.
आम्ही वेशीबाहेर जन्मलो
त्याची खंत तुम्ही केली नाही.
पाण्याच्या थेंबासाठी तुडवले आहेत
किती एक उन्हाळे पायाखाली
तेंव्हा तुम्ही कधीही माणूस झाला नाहीत." [९]

मनूच्या तत्वज्ञानाने दलितांचे जीवन कसे उध्वस्त झाले याचा प्रत्यय वरील कवितेतून येतो. आपल्यावर होणाऱ्या अन्याया मागील सत्य सांगण्याचा विद्रोह कवीन येथे केला आहे. याच मनूने निर्माण केलेल्या संस्कृतीवर हल्ला करतांना ज. वि. पवार म्हणतात,

"जाळायचे म्हणतोय संस्कृतीचे मढे
जे शतकानुशतके तिरडीवर पडून आहे
ज्याला तुम्ही घाबरत आलायत
शेतातल्या बुजगावण्याला माकडाने भ्यावे तसे." [१०]

प्रस्थापित व्यवस्थेतील संस्कृतीवर प्रहार करुन कवीने तिला नामशेष करण्याचा विडा उचलला आहे. हा अन्याय-अत्याचार किती दिवस सहन करणार म्हणून अर्जुन डांगळे म्हणतात,

"आता तुझ्या मुर्दाड मनातून ठिणग्या फुलू देत
आता तुझ्या रुख्या सुख्या ओठातून ज्वाळा निघू देत
आता तुझ्या रुतलेल्या पावलांना चाके फुटू देत
आता तुझ्या हातातील बेडया कडाकड तुटू देत. " [११]

यातुनच क्रांती होऊन दलितांच्या जीवनात सूर्य उगवणार आहे. तेंव्हा प्रल्हाद चेंदवणकर म्हणतात,

"मग, चल ऊठ तर,
तुझा आवाज, माझा आवाज
एका चेनने घट्ट बांधूया
तुझा खांदा, माझा खांदा
नटबोल्टने टाईट सांधूया
तुझे रक्त, माझे रक्त
एका बॉयलरमध्ये ओतू या
अणुस्फोटाचाही झाला नसेल
असा प्रचंड स्फोट करु या
दलितांची सत्ता साऱ्या जगावरती स्थापू या. " [१२]

यावरुन आपणास कवीच्या बुलंद इराद्याची कल्पना येते. सर्वच दलित कवींच्या कवितेत विद्रोह ठासोठास भरलेला दिसतो.

**निष्कर्ष -**

१) दलित काव्याचा मुख्य स्वर विद्रोहाचा आहे.
२) दलित काव्यातील विद्रोह विविध पातळयावरुन आलेला आहे.
३) दलित काव्यातील विद्रोहाचा संबंध जगण्याशी आहे. त्याचप्रमाणे जाणिवेशी देखील आहे.

४) दलित काव्यातील विद्रोह हा अस्पृश्यते विरुध्द आहे. त्याचप्रमाणे येथिल संस्कृती, रुढी, परंपरांच्या विरुध्द आहे.

५) दलित काव्यातून आलेल्या विद्रोहामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणा आहेत.

**समारोप -**

दलित काव्यातील विद्रोहाचा अभ्यास करत असतांना दलित ही संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे. त्याचबरोबर काव्य म्हणजे काय? आणि विद्रोह या शब्दाचा अर्थ नोंदविण्यात आला आहे. त्यानंतर विविध दलित कवींच्या काव्याच्या आधारे दलित काव्यातून आलेल्या विद्रोहाची चर्चा करुन काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**संदर्भग्रंथ सूची -**

१) डॉ.सुरेश पैठणकर, उत्तम बंडू तुपे यांचे साहित्य : आस्वाद आणि समीक्षा, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १० मार्च २००५, पा. १९,२०.

२) अर्जुन डांगळे, दलित विद्रोह, लोकवाड.मयगृह, मुंबई, चौथी आवृत्ती, ऑगस्ट २०११, पा. १४३

३) मो., रा. वाळंबे, सुगम मराठी व्याकरण लेखन, नितीन प्रकाशन, पुणे, नवीन सुधारित आवृत्ती, जून २००३, पा. १९०

४) तत्रैव पा. १९०

५) डॉ. श्रीराम गुंदेकर, समाजाच्या भय आणि शोषणमुक्तीसाठी विद्रोह, दै. सकाळ, औरंगाबाद, फेब्रुवारी २०१४, पा. ७

६) डॉ. शरणकुमार लिंबाळे, साहित्याचे निकष बदलावे लागतील, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ ऑक्टोबर २००५, पा. २२७

७) दया पवार, कोंडवाडा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती, जुलै १९९४, पा. १५

८) नामदेव लक्ष्मण ढसाळ, गोलपिठा, लोकवाड.मय गृह, मुंबई, सहावी आवृत्ती, डिसेंबर २००९, पा. ११

९) वामन निंबाळकर, गावकुसाबाहेरील कविताः आस्वाद आणि समीक्षा, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, पाचवी, आवृत्ती, २७ जुलै २०१४, पा. १६८

१०) ज. वि. पवार, नाकेबंदी, अस्मिता कम्युनिकेशन, मुंबई, तृतीय आवृत्ती, ०६/१२/२०११, पा.४६

११) अर्जुन डांगळे, छावणी हलते आहे, कर्मवीर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १४ एप्रिल १९७७, पा. ३३

१२) प्रल्हाद चेंदवणकर, ऑडिट, अभिनव प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, ऑगस्ट १९७६, पा. ५०

ISSN NO. 2350-1391

Parthmesh Prakashan, Aurangabad

International Recognized Multidisciplinary Research Journal

# NEW INTERNATIONAL VALUABLE RESEARCH JOURNAL

## Certificate

*This is to certify that our Editorial & Advisory Board accepted Research paper of*

Dr./Sir/Smt. गोरे मारुती प्रभू

Topic दलित काव्यातील विद्रोह

College / Institution

*The Research is Original & Innovative. [illegible] published in the Volume No.:* IV ,

*Issue No.:* III , *Month of* NOV, 2018

Asst. Prof. A.V. Hingmire
Chief Editor